कार्यालय नगर पंचायत कारंजा (घा.), जि.वर्धा

जा.क्रं.२७८ /एनएपी-३४/१५-१६

मौजा शेकापुर, तालुका कारंजा, जि.वर्धा

संदर्भ : १. मा. अप्पर जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडील पत्र क्रं. प्रस्तु/अजि/ कावि-२०१२/१५, दिनांक १७/१०/२०१५

२. मा. उपविभागीय अधिकारी आर्वी यांचेकडील पत्र क्रं./अकृषक/सिर/ कावि-१६०/१६,दिनांक ३०/४/२०१६

३. मा. तहसिलदार कारंजा (घा.) याचे पत्र क्रं. प्रस्तु.-१/कावी-३०८६/२०१६ दिनांक ०४/०७/२०१६

अर्जदार : श्री. प्रविण भैय्यालाल भादे
रा. पितृछाया, ३८ गजानन नगर, त्रिमुर्ती नगर नागपूर-२२,

00000

अंतीम आदेश

(पारीत दिनांक २५ /७/२०१६)

ज्याअर्थी अर्जदार श्री. प्रविण भैय्यालाल भादे, रा. नागपूर यांनी खालील तपशीलवार कृषक जमीनीचे निवासी प्रयोजनाकरिता अकृषक करण्याची परवानगी मिळण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अंतर्गत अर्ज सादर केलेला होता. वरील संदर्भीय पत्र क्रमांक १, २, ३ चे पत्रावरून प्रकरण पंजीबद्ध करण्यात आले.

अकृषक करावयाच्या जमीनीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

मौजा	मौजा नं.	शेत सर्व्हे नबंर	आराजी हे.आर.	हक्क	अकृषक क्षेत्रफळ	अकृषक प्रकार	भुधारकाचे नाव
शेकापुर	१०५	५३/१क	१.९३	वर्ग-१	१९३००	निवासी	श्री.प्रविण भैय्यालाल भादे रा. नागपूर

उपरोक्त तपशिलातील कृषक जमीनीचे रूपांतर निवासी प्रयोजनार्थ अकृषक वापर करण्याची परवानगी अर्जदार यांनी मांगितली असल्याने प्रकरणात खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मौजा शेकापुर हे गांव अर्जदारांनी अर्ज करते वेळी ग्रामपंचायत कारंजा (घा.) क्षेत्रात असल्याने अर्जदार यांना अकृषक परवानगी देण्याबाबत हितसंबधीतास किंवा अन्य कोणास काही आक्षेप असल्यास आक्षेप सादर करण्यास दिनांक १०/०६/२०१३ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

...१...

Scanned with CamScanner

खालील विभागाकडून उपरोक्त जमिन निवासी प्रयोजनाकरिता अकृषक करण्याबाबत अभिप्राय/ ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात आले.

१) उपविभागीय अधिकारी, आर्वी

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी

३) कार्यकारी अभियंता, महा.राज्य विद्युत मंडळ, आर्वी

४) नगर रचनाकार वर्धा

५) मा.जिल्हा पुनर्वसन अधिकारी, वर्धा

६) मा. विशेष भुसंपादन अधिकारी, वर्धा

७) तहसिलदार, कारंजा (घा.)

८) अधिक्षक अभियंता निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा

९) कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग वर्धा

१०) कार्यकारी अभियंता निम्न वर्धा प्रकल्प

११) ग्रामपंचायत कारंजा (घा.)

मा. उपविभागीय अधिकारी आर्वी यांचे पत्र क्रं. /सिर/उविअ/कावी ६८४/१३ दिनांक ८/८/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी जा.क्रं. ३९१०/तां/ २०१३, दिनांक १/८/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

कार्यकारी अभियंता, महा.राज्य विद्युत मंडळ, आर्वी यांना दिनांक २८/६/ २०१३ ला पत्र दिल्यानंतरही विहीत मुदतीत अजुनपावेतो त्यांचे अभिप्राय प्राप्त झालेले नाही त्यामुळे त्यांची हरकत नाही असे समजण्यात येते.

नगर रचनाकार, वर्धा यांचे जा.क्र./अकृषक/मौजा शेकापुर/स.क्रं.५३/१क/ नरव/७८५ दिनांक २८/४/२०१६ अन्वये अभिन्यासास मंजुरीची शिफारस या कार्यालयाला प्राप्त झालेली आहे.

मा. जिल्हा पुनर्वसन अधिकारी वर्धा यांचे पुनर्वसन/अका/कावी १५६६/१३, दिनांक ३०/६/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

मा. विशेष भुसंपादन अधिकारी, वर्धा यांचे क्रं./प्र.अ./भुस/ कावी क्यु/१३, दिनांक २६/७/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

Scanned with CamScanner

तहसिलदार, कारंजा (घा.),यांचे रा.मा.क्र./प्र.१/कावी ६४२/१३ दिनांक २९/६/२०१३ अन्वये यापुर्वीच नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

अधिक्षक अभियंता निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा यांचे पत्र क्रं./जा.क्रं.१९७५/चिशा २/१२, दिनांक १८/६/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग वर्धा यांचे पत्र क्रं./जा.क्रं.२३१३/रेशा/अकृषक/२०१३ दिनांक २५/६/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

कार्यकारी अभियंता निम्न वर्धा प्रकल्प, वर्धा यांचे पत्र क्रं./जा.क्रं.१४९५/चिशा/निवप्र/पुनर्व/१३ दिनांक १७/६/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

ग्रामपंचायत कारंजा (घा.) यांचे पत्र क्रं./जा.क्रं.२९१३, दिनांक ५/७/२०१३ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

एकंदरीत प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात आली असून प्रकरणात प्राप्त झालेले विविध विभागाचे अभिप्राय व उपलब्ध कागदपत्रे यावरून श्री. प्रविण भैय्यालालजी भादे, रा.नागपूर यांचे मालकी व कब्जातील मौजा शेकापुर, येथिल शेत सर्व्हे नं. ५३/१क, आराजी १.९३ हे.आर. शेत जमिनीचा निवासी प्रयोजनाकरिता अकृषक करण्याची परवानगी खालील अटी व शर्तीवर देत आहे.

अटी व शर्ती

१. अभिण्यासात खुली जागा ईत्यादी करिता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतिरिक्त संपुर्ण अभिण्यासा खालील भुखंडाचा उपयोग फक्त निवासी वापरा करिताचा करण्यात यावा.

२. भविष्य काळात पुढे अभिन्यास भूखंडाचे विभाजन करू नये.

३. सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा/भुखंडाचा उपयोग/वापर त्याच कामाकरिता करण्यात यावा.

Scanned with CamScanner

४. सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित करतांना खुल्या जागेचा उपयोग [illegible] कामाकरिता करावा व सदर जागा विनामुल्य स्थानिक प्राधिकरणाकडे व्यवस्थे करिता हस्तांतरीत करावी.

५. विषयांकित जागेत काही वृक्ष असल्यास ती नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावी.

६. मंजुर अभिण्यासाचा विकास करतांना रस्त्याचे कडेला दुतर्फा प्रत्येक ५ मिटर [illegible] झाडे लावण्यात यावी. तसेच खुल्या जागेमध्ये देखील पुरेश्या प्रमाणात झाडे लावण्यात यावी.

७. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ (जमीनीच्या वापरातील बदल व अकृषक आकारणी) मधील नियमाचे पालन करावे.

८. विषयान्कीत जागेतील अभिन्यासात बांधकाम करतांनी स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेण्यात यावी.

९. अभिन्यासाच्या हद्दीत व क्षेत्राबाबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास किंवा तफावत आढळल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

१०. अभिन्यासातील रस्ते, नाल्या, विज व पाणी इतर नागरी सुविधांचा संपूर्ण विकास केल्याशिवाय भुखंडाचे विक्री करता येणार नाही.

११. अकृषक परवानगी देण्यात येत असलेल्या जमीनीचा तपशील पुढील प्रमाणे :-

मौजा	शेत सर्व्हे नबंर	आराजी हे.आर.	अकृषक वापर	एकूण भुखंड	भुखंडाचे एकूण क्षेत्र	क्षेत्र रोड	खुले क्षेत्र	एकूण जागेतील क्षेत्र
शेकापुर	५३/१क	१.९३	निवासी	६८	१२१०४.०७	५२५८.६८	१९३७.२५	१९३०

१२. मौजा शेकापुर , ता.कारंजा (घा.) हे गांव नगर पंचायत क्षेत्रामध्ये आहे. त्यामुळे मा. तहसिलदार कारंजा (घा.) यांचेकडून शेत सर्व्हे नं. ५३/१क बाबत सनद मंजूर करून घेण्यात यावी.

Scanned with CamScanner

वरील प्रमाणे अटी व शर्तीचे अधिन राहून सदर आदेश पारीत करण्यात येत आहे.

(व्ही.एन.कातोरे)

मुख्याधिकारी नगरपंचायत
कारंजा (घा.)

प्रतिलीपी :-

१) मा. तहसिलदार, कारंजा (घा.)

२) मा. तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, कारंजा

३) तलाठी मौजा शेकापुर, तालुका कारंजा, जि.वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

४) अर्जदार श्री. प्रविण भैय्यालाल भादे, रा. नागपूर, ता., जि.नागपूर

यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

(व्ही.एन.कातोरे)

मुख्याधिकारी नगरपंचायत
कारंजा (घा.)

Scanned with CamScanner